सन २०२६-२७ या आर्थिक वर्षामध्ये लेखाशिर्ष २२३५ ए८५७ अंतर्गत निधी वितरीत करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
महिला व बाल विकास विभाग
शासन निर्णय क्रमांकः मबावि-२०२६/प्र.क्र.१२१/का-०२ (e-१७३५५९६)
नवीन प्रशासन भवन, ३ रा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक:- २५ ऑगस्ट, २०२६.

वाचा :-

१. वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०२६/प्र.क्र.४०/अर्थ-३, दि.०९.०४.२०२६.
२. जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, चंद्रपूर पत्र क्र.जिमबाविअका/तरतूद मागणी/२०२६-२७/जा.क्र.१५९५, दि.१०.०७.२०२६
३. जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, सिंधुदुर्ग पत्र क्र.जिमबाविअका/सिंधू/तरतूद मागणी/२०२६-२७/१०४४, दि.१८.०६.२०२६
४. जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, रायगड क्र.जिमबाविअ/राअ/अनुदान मागणी/ए८५७/जून २०२६/२०२६-२७/१३७३, दि.१६.०६.२०२६

प्रस्तावना :-

कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५ ची अंमलबजावणी करण्यासाठी सन २०२६-२७ या वित्तीय वर्षात मागणी क्र.एक्स-१, २२३५, सामाजिक सुरक्षा व कल्याण, ०२, समाज कल्याण, १०३, महिला कल्याण, (२३) संरक्षण अधिकारी (२३) (०१) संरक्षण अधिकारी (अनिवार्य) (२२३५ ए८५७) या लेखाशिर्षाअंतर्गत २०-इतर प्रशासकीय खर्चासाठी रु.३५.९० लक्ष इतकी अर्थसंकल्पिय तरतूद करण्यात आली आहे. सदर अर्थसंकल्पीय तरतूदीमधून वित्त विभागाने प्रशासकीय खर्चासाठी उपलब्ध करुन दिलेला रु.६,५६,५००/- इतका निधी आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे यांना वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५ ची अंमलबजावणी करण्यासाठी सन २०२६-२७ या वित्तीय वर्षात पुढील तक्त्यातील रकाना क्र.२ येथील लेखाशिर्षांतर्गत रकाना क्र.३ येथील अर्थसंकल्पीतय निधीमधून रकाना क्र.४ प्रमाणे रु.६,५६,५००/- (अक्षरी रुपये सहा लक्ष छप्पन हजार पाचशे फक्त) इतका निधी आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे यांना वितरीत करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे:-

(रु.हजारात)

अ. क्र.	लेखाशिर्ष/बाब	सन २०२६-२७ साठीची अर्थसंकल्पिय तरतूद	या शासन निर्णयान्वये वितरीत निधी
१	२	३	४
१	मागणी क्र. एक्स-१, २२३५ -सामाजिक सुरक्षा व कल्याण ०२, समाज कल्याण, १०३, महिला कल्याण, (२३) संरक्षण अधिकारी, (२३) (०१) संरक्षण अधिकारी (अनिवार्य) (२२३५ ए८५७) २०-इतर प्रशासकीय खर्च	३५९०.००	६५६.५०
एकूण		**३५९०.००**	**६५६.५०**

२. सदर निधी खर्च करताना वित्त विभागाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचना, प्रचलित निकष, वित्तीय अधिकाराचे प्रत्यायोजन यांचे काटेकोर पालन करण्याची तसेच, वित्त विभागाने वेळोवेळी शासन परिपत्रकान्वये विहित केलेल्या तरतुदी व अटी शर्तींचे पालन करण्याबाबत नियंत्रण अधिकारी तथा आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे यांनी दक्षता घ्यावी.

३. उपरोक्त प्रमाणे वितरीत केलेला निधी जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, चंद्रपूर, सिंधुदूर्ग व रायगड यांच्या मागणीनुसार खर्च करण्यात यावा.

४. सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी सदर लेखाशिर्षाखाली अर्थसंकल्प वितरण प्रणालीवर उपलब्ध करुन दिलेला निधी खर्च होईल, याची नियंत्रण अधिकारी तथा आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे यांनी दक्षता घ्यावी.

५. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.२४१/व्यय-६, दि.०६.०८.२०२६ अन्वये देण्यात आलेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा सांकेतांक २०२६०८२५१७१४४१४५३० असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

PRASAD VINAYAKRAO KULKARNI

Digitally signed by PRASAD VINAYAKRAO KULKARNI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=WOMEN AND CHILD DEVELOPMENT DEPARTMENT, 2.5.4.20=83b8be9eb843dd6eccbd6aa4f9eecd0b5f7aca67ff32b2eef7b9ed2d85ab9442, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=7D19730DDF785210D50C28934B75E9B7B4F5D06B6181CF1901CE3E48EC9E3985, cn=PRASAD VINAYAKRAO KULKARNI
Date: 2026.08.25 18:02:51 +05'30'

(प्र.वि. कुलकर्णी)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता),(लेखापरिक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर,
२. अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई,

३. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
४. सचिव, महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई,
५. आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे,
६. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
७. संबंधित जिल्हा कोषागार अधिकारी,
८. निवासी लेखापरिक्षा अधिकारी,मुंबई,
९. संबंधित जिल्हाधिकारी
१०.संबंधित विभागीय उपायुक्त
११.संबंधित जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी
१२.कक्ष अधिकारी, नियोजन विभाग (का.१४७२) / वित्त विभाग (व्यय-६), मंत्रालय, मुंबई,
१३.कक्ष अधिकारी (का.४/अर्थसंकल्प), महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांना सदर निधी बी.डी.एस. प्रणालीवर वितरीत करण्याचा विनंतीसह अग्रेषित,
१४.निवडनस्ती, का-०२.